# जयसिंगपूर-उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर.

पोस्ट - जयसिंगपूर-४१६ १०१ ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

## ५७ वा वार्षिक अहवाल २०१५-२०१६

**ऑडीट वर्ग 'अ'**





## आमचे मार्गदर्शक



उद्यानपंडीत मा. श्री. गणपतराव पाटील

# जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर.

## ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

जयसिंगपूर - उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर (ता. शिरोळ) या बँकेची सन २०१५-१६ वर्षाकरिता ५७ वी वार्षिक सर्व साधारण सभा बुधवार दिनांक २१-०९-२०१६ ई. रोजी दुपारी २.०० वाजता, मर्चन्ट असोसिएशन हॉल, ९ वी गल्ली, जयसिंगपूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेकरिता बोलविणेत येत आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

*** सभेपुढील विषय ***

१) मागील दिनांक १३/०८/२०१५ ई. रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने दिनांक ३१/०३/२०१६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा शासकीय लेखापरिक्षकांनी सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा-तोटापत्रक स्वीकृत करणे.

३) सन २०१४-२०१५ या सालाचे शासकीय लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.

४) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१६-२०१७ चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन २०१५-२०१६ या सालात अंदाजपत्रकापेक्षा कमी-जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.

५) सन २०१५-२०१६ या सालातील झालेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजूरी देणे.

६) सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता अंतर्गत, कंकरंट हिशोब तपासणीस यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता शासकीय लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८) सन २०१५-२०१६ या सालातील शासकीय लेखापरीक्षक मे.ए.डी.शिंदे आणि कं. चार्टर्ड अकौटंट यांचेकडून मिळालेला लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.

९) बँकेच्या मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

१०) सन २०१६-२०१७ या वर्षाकरीता बाहेरील भांडवल उभारणेची कमाल मर्यादा ठरविणे.

११) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या मान्यतेने तडजोडीने केलेल्या थकीत कर्ज वसुलीस मंजूरी देणे.

१२) बँकेच्या सभासदांना प्रशिक्षण देणेबाबत विचार विनियम करणे.

१३) बँकेने केलेल्या व करावयाच्या भांडवली गुंतवणुकीस मान्यता देणे.

१४) बँकेच्या नावातील बदलाबाबतची नोंद घेणे.

१५) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस माफी देणेबाबत विचार **करणे.**

१६) मे. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषयांवर चर्चा करणे.

**एस. बी. चौगुले.**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ - जयसिंगपूर.
दिनांक- २४.०८.२०१६

*** सभासदांना नम्र सूचना ***

१) बँकेच्या कामाकाजासंबधी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर सभासदानी दिनांक १६/०९/२०१६ पूर्वी बँकेकडे लेखी कळवावे. २) गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा भरेल व त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही. ३) आपला पत्ता बदलला असलेस नवीन पत्ता प्रधानकार्यालयाकडे त्वरीत कळवावा. तसेच लाभांश बँकेच्या कामकाजाच्या वेळेत घेऊन जावे. ४) सभासदांनी आपला लाभांश जमा करणेसाठी नजीकच्या शाखेत सेव्हींग खाते सुरु करावे. तसेच तीन वर्षावरील डिव्हीडंड जे सभासद दि.३१/१२/२०१६ पर्यंत नेणार नाहीत. अशा सभासदांचे डिव्हीडंड रिझर्व्ह फंडास वर्ग केले जाईल. ५) अहवालाच्या व हिशोब पत्रकाच्या प्रती प्रधान कार्यालयात व शाखा कार्यालय येथे सभासदांचे माहितीसाठी ठेवणेत आलेल्या आहेत. तसेच www.jusbbank.com या वेबसाईट वर बँकेचा अहवाल पहावयास मिळेल.



# अध्यक्षांचे मनोगत ..

**सन्माननीय बंधू-भगिनीनो**

**सस्नेह नमस्कार,**

जयसिंगपूर उदगांव सहकारी बँकेच्या ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहिलात त्याबद्दल मी व्यक्तिश: व संचालक मंडळाचे वतीने सर्वाचे मन:पुर्वक हार्दीक स्वागत करीत आहे. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाची कामगिरी व फलनिष्पत्ती ठरवणारा दिवस ३१ मार्च २०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके आपणापुढे सादर करताना मला आनंद होत आहे.

सभासद व ठेवीदार यांचा विश्वास कणाकणाने कमावत बँक एका भक्कम पायावर उभी राहिली आहे. कोल्हापूर व सांगली जिल्हा कार्यक्षेत्र विस्तारताना एक सक्षम बँक हा लौकीक बँकेने ढळू दिला नाही. सभासद, ठेवीदारांच्या मदतीने भक्कम पाया निर्माण करुन बँकेचे संस्थापक आदरनिय कै. माजी आमदार **डॉ.श्री.आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटीलसाहेब** यांचे स्वप्नपूर्तीसाठी आपल्या मदतीने पुढे वाटचाल करीत आहोत. मला विशेष आनंद वाटतो की बँकेच्या दिनांक १३/०८/२०१५ रोजी झालेल्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपण सर्व सभासदांनी मागणी केले प्रमाणे बँकेचे नाव **डॉ. आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर** असे नामांकरन करण्यास रिझर्व्ह बँकेने व सहकार खात्याने मंजुरी दिली आहे.

सन २०१५-२०१६ या वर्षात बँकेने सर्वच क्षेत्रात उत्तम प्रगती केलेली आहे. बँकेने रूपये २६८ कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. येत्या ५ वर्षात ५०० कोटीचे वर उद्दीष्ट पूर्ण करण्याचे ठरविले आहे. अतिरिक्त निधीची फायदेशीर गुंतवणुक व आर्थिक वर्षात वाढत गेलेल्या बँक व ठेव व्याजदराचा बँकेने फायदा उठवत रु. २ कोटी ५५ लाख इतका उच्चांकी करपूर्व ढोबळ नफा मिळविला आहे. अशा रितीने कार्यविस्तार, उद्दिष्ट पुर्ती, व्यावसायिक व्यवस्थापन, आर्थिक शिस्त व आधुनिक तंत्रज्ञान याव्दारे बँकेने गौरवास्पद कामगिरी केलेली आहे.

उत्पादन क्षमता टिकून राहावी यासाठी बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कर्मचाऱ्यांची उत्पादन क्षमता वाढून प्रति सेवक व्यवसायामध्ये रू. ३८ लाखांची वाढ होऊन तो रू. ३ कोटी २२ लाख झाला आहे. तसेच प्रति सेवक नफा रू.१.८१ लाख इतका झालेला आहे. हे बँकेच्या सक्षमीकरणाचे द्योतक आहे.

''**हायटेक**'' तंत्रज्ञानाचा अवलंब करीत असताना बँकेने सर्वसाधारण सभासद, खातेदार, ग्राहक, ठेवीदार व कर्जदार इत्यादी घटकांशी असणारा संबध दुरावणार नाही याची दक्षता घेतली आहे. बँकेच्या तसेच शाखेच्या वर्धापनदिन निमित्ताने होणाऱ्या ग्राहक भेटीत ग्राहकांच्या सूचना अपेक्षा ग्राहकांचे समाधान इत्यादी बाबी व्यवस्थापनापर्यंत पोहचतात. त्यामुळे बँकवाढीस पोषक धोरण ठरवण्यात मदत झाली आहे. बँकेने सन २०१९ अखेर संभाव्य व्यवसाय आराखाडा तयार केला असुन बँक त्या प्रारूप आराखडयानुसार मार्गक्रमन करीत असून त्यानुसार बँकेचा विकास व विस्तार यात निश्चित यश प्राप्त होईल.

**सन २०१५–२०१६ च्या अर्थिक वर्षाचा आढावा**

अहवाल सालामध्ये बँकेने दरवर्षीप्रमाणे वाटचाल सुरू ठेवली असुन ही बाब तुलनात्मक आकडेवारीवरून लक्षात येईल.

**बँकेची तुलनात्मक सांपत्तीक स्थिती.**

| अ.नं | तपशील | ३१/०३/२०१४ | ३१/०३/२०१५ | ३१/०३/२०१६ |
|---|---|---|---|---|
| १. | सभासद संख्या | १०५०५ | १०८९२ | १११०६ |
| २. | अधिकृत भाग भांडवल | १०,००,००,०००/- | १०,००,००,०००/- | १०,००,००,०००/- |
| ३. | वसुल भाग भांडवल | ३,२३,७३,१००/- | ५,६५,१४,२७५/- | ५,९५,००,३७५/- |
| ४. | राखीव व इतर निधी | ७,८८,४९,४६०/- | ८,९४,२१,५६४/- | ९,८३,७५,१२४/- |
| ५. | ठेवी | १,३७,७९,२५,८९८/- | १,४२,२२,६०,९७४/- | १,८०,६२,९२,१४६/- |
| ६. | कर्जे | ६५,७८,१७,८२५/- | ८२,११,५४,४८९/- | ८६,६१,२५,१८८/- |
| ७. | गुंतवणुक | ५७,३५,०८,६१८/- | ६१,७१,५३,९५६/- | १,०३,२४,३३,५७२/- |
| ८. | नफा | ७७,२७,०१३/- | १,०१,२८,९१६/- | १,५०,०३,३३०/- |
| ९. | ढोबळ एन.पी.ए. | ५.५४% | ५.२९% | ६.१७% |
| १०. | निव्वळ एन.पी.ए | ०.९४% | ०.९५% | १.३६% |
| ११. | भांडवल पर्याप्तता | १२.२८% | १४.३२% | १६.२३% |
| १२. | लांभाश | १२.००% | १२.००% | १२.००% (शिफारस) |
| १३. | ऑडीट वर्ग | ''अ'' | ''अ'' | ''अ'' |

**सभासद –**

अहवाल सालात गतवर्षीच्या १०८९२ सभासदात २७९ ने वाढ झाली असून ६५ सभासद कमी झालेने वर्षाअखेर बँकेचे नियमीत सभासद संख्या ११,१०६ इतकी आहे. अहवालसालात वसुल भाग भांडवलामध्ये रु. २९.८६ लाख इतकी वाढ झाली आहे.

**भाग भांडवल:–**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रूपये दहा कोटींचे असून अहवाल साल अखेर वसूल भागभांडवल रूपये ५,९५,००,३७५/– इतके आहे. भाग भांडवल वाढीचे शेकडा प्रमाण ५.१८ टक्के आहे.

सहकार कायद्यातील सुधारणेनुसार बँकेच्या प्रत्येक भागाची किंमत रू.१००/– वरून रू.१०००/– करणेत आली आहे. तरी सभासदानी जरूर त्या रक्कमेचा भरणा करून आपले भागभांडवलातील हिस्सा रू.१०००/– च्या पटीत तातडीने करून घ्यावा.

**राखीव व इतर निधी :–**

बँकेचा आर्थिक पाया भक्कम होण्यासाठी भागंभाडवलाबरोबरच राखीव व इतर निधीची तरतूद असणे तितकेच महत्वाचे आहे. ३१ मार्च २०१६ अखेर गगांजळी रू.२,९३,९२,३३८.४० व इतर निधी रू. ६,८९,८२,७८५.२१ असे मिळून एकूण स्वनिधी रू.९,८३,७५,१२३.६१ असा आहे. अहवाल वर्षातील नफा विभागणी नंतर स्वनिधी रू.१०,६४,५३,४५३.७४ इतका होईल. बदलत्या धोरणांना सक्षमपणे सामोरे जात दरवर्षीच्या नफ्यातून अधिकतर भाग निर्धीकडे वळवून बँकेने निधीमध्ये वाढ केलेली आहे. बँकेचा आर्थिक पाया किती भक्कम आहे यावरच बँकेचे अस्तित्व व सभासदांचे हिताचे रक्षण अवलंबून असते.

**भांडवल पर्याप्तता –**

रिझर्व बँक ऑफ इंडीयाच्या निकषानुसार भांडवल जोखीम पर्याप्तता प्रमाण बँकेस किमान ९.००% असताना सदरचे प्रमाण आपल्या बँकेने १६.२३% इतके राखले आहे. यावरून आपल्या बँकेची आर्थिक सक्षमता दिसुन येते.

**ठेवी –**

जनमाणसातील विश्वास हाच खरा बँकेच्या प्रतिमेचा सन्मान असतो. या विश्वासाचे द्योतक म्हणजे बँकेने आपल्या नावलौकीकावर मिळविलेल्या ठेवी होय.

अर्थिक स्थैर्याच्या जोरावर समाजामध्ये विश्वासार्हता निर्माण केलेने ठेवीचे व्याजदर अन्य बँकांच्या तुलनेने कमी ठेवूनही बँकेच्या ठेवीमध्ये वाढ झालेली आहे. दि.३१.०३.२०१५ रोजी बँकेच्या एकूण ठेवी रू.१४२२२.६१ लाख इतक्या होत्या वर्षभरात त्यामध्ये रू.३८४०.३१ लाखाची वाढ होऊन दि.३१.०३.२०१६ अखेरीस बँकेच्या ठेवी रू.१८०६२.९२ लाख इतक्या झाल्या आहेत. ठेव वाढीचा वेग २७ टक्के इतका आहे. ठेवीदारांच्या ठेव रक्कमेच्या सुरक्षेसाठी ठेवींचा विमा डि.आय.सी.जी.सी यांचेकडे उतरविला असून त्यांचा विमा हप्ता नियमितपणे प्रत्येक सहामाहीस आगवू भरला जातो

**कर्जे –**

बँकेच्या ठेवी जितक्या जास्त तितकी बँक सुदृढ ही संकल्पना आता बदललेली आहे. आता बँकेच्या व्यवसायास महत्व प्राप्त झालेले आहे. व्यवसाय म्हणजे ठेवी अधिक कर्जे होय. त्यातही कर्जे अधिक महत्वाची ठरतात. दि.३१.०३.२०१५ रोजी बँकेची एकूण कर्जे रू.८२११.५४ लाख इतकी होती. अहवाल सालात त्यात रू.४४९.७१ लाखाची वाढ होऊन अहवाल साल अखेर कर्जे रू.८६६१.२५ लाख इतकी झाली आहेत. सभासदांना त्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन शेती, व्यवसाय व उद्योग वाढीसाठी तसेच कौटुंबिक कारणासाठी माफक व्याजदरात कर्ज पुरवठा करुन त्याचे जीवनमान उंचावणेचा प्रयत्न केला आहे.

**अग्रक्रम क्षेत्रास कर्जपुरवठा –**

आपल्या बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अग्रक्रम क्षेत्रास रू.६२६८.७३ लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्याचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ७२.३८ टक्के आहे. तसेच दुर्बल घटकांना रू. २७५९.२१ लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्याचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ३१.८६ टक्के इतका आहे.

**गुंतवणूक –**

कर्जव्यवहारानंतर ताळेबंदाची जिंदगी दर्शवणारी दुसरी महत्वाची बाजु म्हणजे गुंतवणूक, गुंतवणूक ही कर्ज व्यवहाराइतकी फायदेशीर नसली तरी रिझर्व्ह बँकेच्या CRR व SLR बाबतच्या तरतुदीचे काटेकोर पालन करून गुंतवणूकीचे व्यवस्थापन केले आहे. रिझर्व्ह बँकेच्या सुधारित नियमानुसार SLR ची गुंतवणूक सरकारी कर्जरोख्यात असणे आवश्यक आहे. बँकेने या आदेशाचीही पुर्तता केली आहे. त्यामुळे सरकारी कर्जरोख्याच्या व्यवहाराला महत्व प्राप्त होऊ लागले आहे. गतवर्षी बँकेची एकूण गुंतवणूक रू.६१७१.५४ लाख इतकी होती. अहवाल सालात गुंतवणुकीमध्ये रू.४१५२.८० लाखानी वाढ होऊन दि.३१.०३.२०१६ अखेर एकूण गुंतवणूक रू.१०३२४.३४ लाख इतकी आहे. तसेच म्युच्यूअल फंडात गुंतणूक करुन व सरकारी कर्जरोख्याची खरेदी-विक्री करून बँकेने अहवाल सालात एकूण रू.११२.७३ लाख इतका नफा मिळविला आहे. कोअर बँकिंग प्रणालीमुळे बँकेकडील उपलब्ध अतिरिक्त निधीचे सुयोग्य नियोजन करणे शक्य झाले आहे.

**संगणकीकरण व तंत्रज्ञान –**

बँकेने प्रधान कार्यालय जयसिंगपूर येथील मुख्य इमारतीत अद्यावत व सुसज्ज असे डाटा सेंटर उभारले आहे. कोअर बँकिंग सोल्युशन (CBS) चे कामकाज पूर्ण झालेले आहे. सर्व शाखा डाटा सेंटरला जोडण्यात आलेल्या असुन सर्व शाखांकरिता Centralized Activity कार्यान्वीत झालेल्या आहेत. याचा सर्वच ग्राहकांना लाभ होत आहे. या सुविधाव्दारे ग्राहकांना बँकेच्या कोणत्याही शाखेतून बँकिंग सुविधा मिळत आहे. बँकेने शाखा दत्तनगर व शाखा जयसिंगपूर येथे ए.टी.एम सुविधा उपलब्ध करुन दिली असुन बँकेच्या ग्राहकांना दोन्हीही ए.टी.एम मधून रक्कम काढता येते. सध्या बँकेने आय.सी.आय.सी.आय.बँकेमार्फत RTGS व NEFT ची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

बँकेचा लवकरच (NPCI) कार्यप्रणालीमध्ये समाविष्ठ होण्याचा मानस आहे. बँकेच्या ग्राहकांना कोणत्याही बँकेच्या ए.टी.एम मधून कोठेही पैसे काढता येतील तसेच इंटरनेट बँकीग व मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध करुण देण्याचा संचालक मंडळचाचा मानस आहे.

**नफा विभागणी –**

अहवाल सालामध्ये बँकेस सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रू.१,५०,०३,३३०.१३ इतका झाला आहे. नफ्याची विभागणी पुढील प्रमाणे करणेत यावी अशी संचालक मंडळाची सर्वसाधारण सभेस शिफारस आहे.

## नफा विभागणी शिफारस

| अ. नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड २५% | ₹ ३७,७५,०६७.३४ |
| २. | जनरल रिझर्व्ह फंड | ₹ ५,००,०००.०० |
| ३. | लाभांश १२% (शिफारस) | ₹ ६९,२५,०००.०० |
| ४. | निवडणुक निधी | ₹ २०,०००.०० |
| ५. | शिक्षण निधी | ₹ १,००,०००.०० |
| ६. | गुंतवणूक चढउतार निधी | ₹ २८,००,०००.०० |
| ७. | तंत्रज्ञान विकास निधी | ₹ १,००,०००.०० |
| ८. | इमारत निधी | ₹ ७,८३,२६२.७९ |
| | **एकूण –** | **₹ १,५०,०३,३३०.१३** |

**अनुत्पादक कर्जे (N. P. A.) व तरतुद –**

बँकेच्या एकूण येणे कर्जबाकीपैकी उत्पन्न क्षमता नसलेल्या (एन.पी.ए) कर्जाचे ढोबळ प्रमाण ६.१७ टक्के आहे. तर निव्वळ प्रमाण १.३६ टक्के आहे.

थकबाकी वसुलीसाठी बँकेचे संचालक मंडळ व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतलेले आहेत. थकबाकी वसुलीसाठी सर्व योग्य व सनदशीर मार्गाचा अवलंब करुन, थकबाकीदारांना समक्ष भेटून, लेखी, तोंडी सुचना देऊन, त्यांच्या अडचणी समजाऊन घेऊन, थकबाकी कमी करणेचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला आहे. मात्र यास प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांवर नाईलाजास्तव कायदेशीर कारवाई, जप्ती, सक्तीने वसुली यासारखे मानहानीकारक कटू प्रसंग येतात. अशा प्रसंगी यापुढे बँकेने अत्यंत कठोर निर्णय घेऊन त्याची ठामपणे अंमलबजावणी करणेचा निर्णय घेतला आहे. असा प्रसंग आपणावर येऊ नये यासाठी थकबाकीदारांनी आपली थकबाकी सत्वर भरुन बँकेच्या प्रगतीत सहभागी व्हावे, असे मी सर्वांना आवाहन करतो.

**तपासणी, लेखापरीक्षण व वैधानिक लेखापरीक्षण –**

बँकेची मार्च २०१५ अखेरची रिझर्व्ह बँक वैधानिक तपासणी रिझर्व्ह बँकेचे असि. जनरल मॅनेजर श्री. आर.एम.शिंपी यांनी केली आहे. त्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाला असून बँक आर्थिक दृष्ट्या मजबूत असून बँकेने स्वत:च्या धोरणाचे व रिझर्व्ह बॅक धोरणाचे काटेकोर पालन केलेस बँकेस भविष्यात कोणतीही अडचण येणार नाही अशी सुचना देवून बँकेच्या एकंदरीत कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

बँकेचे सन २०१५–२०१६ चे वैधानिक लेखापरीक्षण मे.ए.डी.शिंदे आणि कं.चार्टर्ड अकौटंट यांनी केले असून त्यांनी बँकेस ऑडीट वर्ग ''**अ**'' दिलेला आहे. लेखापरीक्षण कालावधीत त्यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्याबद्दल बँक त्यांचे अत्यंत आभारी आहे. तसेच बँकेचे ककरंट व अंतर्गत लेखापरीक्षण लेखापरीक्षकामार्फत नियमित केले जाते.

**संचालक मंडळ –**

अहवालसालात बँकेची सन २०१५–२०१६ ते २०२०–२०२१ या कालावधीसाठी संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली याचाच अर्थ की सभासदांनी आम्हास केलेल्या कामाची दिलेली पोहच पावतीच म्हणावी लागेल त्याबद्दल बँकेच्या सर्व सभासदांचा मी व नव निर्वाचित संचालक मंडळ ऋणी आहोत. बँक निवडणुकीचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी श्री. सुनिल धायगुडेसो। व श्री. प्रमोद फडणीससो। यांनी काम पाहिले त्याचा मी आभारी आहे.

अहवालसालात संचालक मंडळ व उपसमित्याच्या एकूण ४० सभा झाल्या आहेत. बँकेच्या प्रगतीमध्ये धोरणातील सकारात्मक व प्रोत्साहनात्मक सहकार्य आणि सर्व निर्णय एकमताने मंजूर केलेने बँकेचे कामकाज सुरळीत व प्रगतीपथावर नेणेसाठी संचालक मंडळातील सर्व सदस्यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे.

**लाभांश –**

मा. संचालक मंडळाने अहवालसालासाठी १२ टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे. तरी त्यास सभासदांनी मंजुरी द्यावी ही विनंती. आपल्या मंजुरीनंतर लाभांश रक्कम सभासदांच्या बचत खात्यात जमा केली जाईल. तरी ज्या सभासदांनी अद्यापही आपली बचत खाती उघडली नसतील त्यांनी ती बँकेच्या नजीकच्या शाखेत लवकरातलवकर उघडावीत.

**सभासदांना नम्र आवाहन –**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रत्येक खातेदाराने बँकेत खाते उघडताना, सभासद होताना के.वाय.सी.नॉर्मची पुर्तता करणे सक्तीचे केले आहे. त्यासाठी आयडेन्टीटी साईजचे दोन फोटो, रेशनकार्ड, निवडणूक ओळखपत्र किंवा आधार कार्ड किंवा पॅन कार्ड किंवा ड्रायव्हींग लायसेन्स याची झेरॉक्स प्रत सही करुन बँकेकडे सादर करणे आवश्यक आहे. जे खातेदार सदर के.वाय.सी. नॉर्म्सची पुर्तता करणार नाहीत त्यांची खाती गोठवली जातील व त्यावर के.वाय.सी.नॉर्म्सची पुर्तता केले शिवाय कोणतेही व्यवहार करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**शाखाविस्तार व आधुनिकीकरण –**

बँकेचे एकूण १० शाखेमधून कामकाज चालू आहे. चालु आर्थिक वर्षामध्ये कोल्हापूर जिल्ह्यात दानोळी, शिरढोण व सांगली जिल्ह्यात कवलापूर, सांगली व मिरज या ५ नव्या शाखेसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची मान्यता मिळाली असून सदर शाखा लवकरच आपल्या सेवेस कार्यान्वीत करीत आहोत.

तसेच कवठेगुलंद शाखेचे लवकरच शिरोळ तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ शाखा आलास यांचे इमारतीत स्थलांतरीत करीत असून त्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची मान्यता मिळाली आहे. तसेच शाखेच्या कुरुंदवाड कडील इमारतीचे वाढीव बांधकाम नुकतेच पूर्ण झाले आहे व चंदूर शाखेचे लवकरच स्वमालकीच्या जागेत भव्य इमारत बांधणेचा मानस आहे.

**सेवक वर्ग –**

अहवाल सालअखेर बँकेकडे एकूण ८३ सेवक आहेत. बँकेचा शाखाविस्तार व कार्य भार दिवसेंदिवस वाढतच आहे. ठेववाढ, कर्जवसुली व नैमित्तिक ग्राहक सेवा यामुळे कामाचा फार ताण पडत असुनही बँकेच्या सेवक वर्गाने अत्यंत विनम्र व तत्परतेने ग्राहकांची सेवा करुन सभासद व ग्राहकांशी आपुलकी व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले आहेत. सेवकवर्गासाठी अपघात वैद्यकीय विमा योजना अंमलात आणून त्यांच्याप्रती बँकेला असलेली आपुलकी व्यक्त केली आहे.

ठेववृध्दी व कर्ज वसुली यांची उध्दीष्ठे पूर्ण करणेसाठी यांनी केलेल्या अथक प्रयत्नाबद्दल मी त्यांचे आपणा सर्वांतर्फे अभिनंदन करतो. यापुढेही बँकींग क्षेत्रातील तीव्र स्पर्धा व नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यास सेवकांनी सिध्द रहावे व आपल्या बँकेचे नाव उज्वल करावे असे मी त्यांना आवाहन करतो.

**आभार व समारोप –**

बँकेच्या प्रगतीस **आदरणीय उद्यानपंडीत मा.श्री. गणपतरावजी पाटीलसाहेब** चेअरमन, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळ यांचे मौलीक मार्गदर्शन मिळत असलेने मी त्यांचा शतश: ऋणी आहे. बँक आजवर जी भक्कम आर्थिक प्रगती यश संपादन करू शकली व जो नावलौकीक मिळाला आहे. ते आपण सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक, सेवा पुरवठादार, विविध संस्था, उद्योजक, कारखानदार यांनी बँकेला सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करून त्या सर्वाचे आभार मानतो.

रिझर्व्ह बँकेचे अधिकारी, मा. विभागीय सहनिबंधकसो, मा. विशेष लेखापरीक्षकसो, मा. लेखापरीक्षकसो, मा.जिल्हा उपनिबधंकसो, मा असिस्टंट रजिस्ट्रार, सहकार खाते, माझे सहकारी संचालक व शाखा सल्लागार, कायदा सल्लागार, व्हॅल्युएटर, बँकेचे सराफ, दि.एम.एस.सी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, बँक फेडरेशन, बँक असोसिएशन कोल्हापूर, श्री.दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि, शिरोळ. यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

आपणा सर्वाचे वाढते प्रेम, विश्वास व सहकार्याच्या पाठबळावर बँकेचा विकास हाच ध्यास मनात कायम करीत बँकेच्या प्रगतीतील सातत्य असेच पुढे चालु राहील अशी ग्वाही देतो व माझ्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतो व मा. संचालक मंडळाच्या वतीने बँकेचा सन २०१५–२०१६ सालाचा ताळेबंद, नफा–तोटापत्रक व अंदाजपत्रक व नफा–विभागणी आपल्या समोर सादर करत असून त्यास सभासदांनी मंजूरी द्यावी अशी विनंती करतो.

**धन्यवाद**

**।। जय हिंद ।। जय महाराष्ट्र ।। जय सहकार ।।**

आपला नम्र,
**महादेव बाबू राजमाने**
चेअरमन

स्थळ : जयसिंगपूर
दिनांक : २४–०८–२०१६


बँकेकडून ठेव विमा हप्तेची रक्कम वेळेत भरली जाते.

# वैधानिक लेखा परिक्षकांचा शेरा

आम्ही जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि.,जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या सहकारी बँकेचे तारीख ३१ मार्च २०१६ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक व तारीख ३१ मार्च २०१६ रोजीचा परिशिष्टीय ताळेबंद, संस्थेने ठेवलेली हिशोबी पुस्तके, व्हौचर्स व मला उपलब्ध करुन दिलेल्या अन्य कागदपत्रांवरुन तपासला असुन आमचे वैधानिक लेखापरिक्षणाचे कामासाठी व त्याचे पुर्ततेसाठी आम्हाला आवश्यक ती माहिती व खुलासे मिळाले आहेत. त्यानुसार आमच्या मते..

१) हिशोबी पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टीत्पतीस येईल त्यावरुन, संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षीत असल्यानुसार योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

२) आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके, संस्थेच्या हिशोबांच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहेत.

३) आमच्या मते, देण्यात आलेल्या संपूर्ण माहिती प्रमाणे, तसेच आम्हाला प्राप्त झालेल्या सर्व शाखांच्या हिशोब पत्रकानुसार आणि आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन, हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती माहिती देतात.

आमच्या लेखापरिक्षण अहवाल भाग 'अ', 'ब', 'क' व परिशिष्ठ यामध्ये नमूद केलेल्या अवलोकनास अनुसरुन
अ) ताळेबंद पत्रकाबाबत दि. ३१ मार्च २०१६ या दिवशीच्या संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व
ब) नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवित आहे.

४) सन २०१५-२०१६ या वर्षासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार बँकेस **''अ''** वर्ग कायम करणेत येत आहे.

**मे. ए. डी. शिंदे आणि कं.**
**चार्टर्ड अकौंटंट**

A. D. SHINDE & CO. OLD PALACE KOLHAPUR. CHARTERED ACCOUNTANTS

**पार्टनर**
**(पॅनेल क्र. १५९२६)**

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २२/०८/२०१६

# दिनांक ३१-३-२०१६ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१०,००,००,०००-००** | **अधिकृत भाग भांडवल** | | **१०,००,००,०००-००** |
| | (अधिकृत भाग भांडवल १,००,००० भाग प्रत्येकी रू. १०००/- प्रमाणे) | | |
| **५,६५,१४,२७५-००** | **वसूल भाग भांडवल** | | **५,९५,००,३७५-००** |
| **८,९४,२१,५६४-१०** | **राखीव व इतर निधी** | | **९,८३,७५,१२३-६१** |
| २,६२,५७,२३३-४० | रिझर्व्ह फंड | २,९३,९२,३३८-४० | |
| १,१३,८९,२८२-७० | इमारत निधी | १,१६,१६,७३७-२१ | |
| १६,००,०००-०० | लाभांश समिकरण निधी | १६,००,०००-०० | |
| ३,५९,००,०००-०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ४,२२,५६,०००-०० | |
| ५,४०,०००-०० | धर्मादाय निधी | ५,४०,०००-०० | |
| २५,००,०००-०० | गुंतवणूक तरतूद | २५,००,०००-०० | |
| ३,००,०००-०० | सेवक कल्याण निधी | ३,००,०००-०० | |
| १०,००,०००-०० | सभासद कल्याण निधी | १०,००,०००-०० | |
| ३९,१०,०००-०० | गुंतवणुक घसारा निधी | १४,१०,०००-०० | |
| ३०,५०,०००-०० | उत्तम जिंदगीसाठी तरतूद | ३४,५०,०००-०० | |
| १८,८०,०४८-०० | इतर संशयीत बुडीत निधी | १८,८०,०४८-०० | |
| १,००,०००-०० | गुंतवणूक चढउतार निधी | २,००,०००-०० | |
| ७,७५,०००-०० | जनरल रिझर्व्ह फंड | १७,९०,०००-०० | |
| २०,०००-०० | निवडणूक निधी | ४०,०००-०० | |
| १,००,०००-०० | टेक्नॉलॉजी निधी | २,००,०००-०० | |
| १,००,०००-०० | शिक्षण निधी | २,००,०००-०० | |
| **१,४२,२२,६०,९७४-७६** | **एकूण ठेवी** | | **१,८०,६२,९२,१४५-९८** |
| **२९,३०,०३,०६५-२३** | **सेव्हिंग ठेवी** | **४१,२२,६९,५४५-११** | |
| २७,४५,३२,२३९-१८ | १) व्यक्ती | ३७,९२,४३,१२३-६८ | |
| १,८४,७०,८२६-०५ | २) संस्था | ३,३०,२६,४२१-४३ | |
| **४,१२,०८,५८२-९३** | **चालू ठेवी** | **६,२२,५८,१३०-२७** | |
| १,५१,७२,२०३-३५ | १) व्यक्ती | १,६०,५६,०१७-४२ | |
| २,५७,१९,८५६-५५ | २) संस्था | ४,५९,१९,७१२-८२ | |
| ३,१६,५२३-०३ | ३) सी.सी.मधील क्रेडीट बॅलन्स | २,८२,४००-०३ | |
| **१,०८,८०,४९,३२६-६०** | **मुदत ठेवी** | **१,३३,१७,६४,४७०-६०** | |
| १९,५६,९६,६९९-०० | १) व्यक्ती | १४,४८,४९,८२७-०० | |
| ३२,५७,४९,८३८-०० | २) संस्था | ४१,२१,१५,५३५-०० | |
| **१,५६,८१,९६,८१३-८६** | **बेरीज पुढील पानावर** | | **१,९६,४१,६७,६४४-५९** |


कोणतेही खाते उघडताना ओळखपत्र व वास्तव्याचा दाखला आवश्यक आहे.

## दिनांक ३१-३-२०१६ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **९,१६,७६,२५२-४१** | **रोख शिल्लक व बँक शिल्लक** | | **८,७०,४२,७२०-९३** |
| २,४२,२१,००२-०० | हातातील रोख शिल्लक | ३,११,४७,३९२-०२ | |
| ६५,५७,४९८-५० | बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | १४,१८,७२९-८७ | |
| ५०,०४,३२४-०४ | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा शिरोळ | ४,४५,३५३-७९ | |
| ५,५५,२२८.४८ | दि एम.एस.सी. बँक लि. शाखा मुंबई | ८४,८०,६२९.१८ | |
| ७८,७६,८३९-८० | के.डी.सी.सी बँक शाखा जयसिंगपूर | ८,३४,१०५-११ | |
| ३५,२५,२८८-१३ | के.डी.सी.सी बँक शाखा इचलकरंजी | २६,८१,८७४-६० | |
| १८,२७७-६६ | के.डी.सी.सी बँक शाखा कोल्हापूर | ०-०० | |
| ५०,१४,१७५-९१ | के.डी.सी.सी बँक शाखा कुरूंदवाड | १८,०१,३५४-९५ | |
| ९,२६,२६८-८६ | के.डी.सी.सी बँक शाखा अब्दुललाट | २,०६,४६१-५१ | |
| १५,११,०६५-८५ | के.डी.सी.सी बँक शाखा शिरोळ | १८,३०,९६३-२१ | |
| ४६,८८,६८२-०० | के.डी.सी.सी बँक शाखा कवठेगुलंद | १३,७३,२५८-६० | |
| १५,५५,००३-४५ | के.डी.सी.सी बँक शाखा खिद्रापूर | ५,२१,२०२-१० | |
| २६,६९,७७०-९० | के.डी.सी.सी बँक शाखा दत्तवाड | ५,६४,०५४-५५ | |
| १४,११८-१७ | एस.डी.सी.सी बँक शाखा सांगली | ०-०० | |
| २६,५०२-०० | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा इचलकरंजी | ०-०० | |
| ३९,१६४-६६ | युनीयन बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ०-०० | |
| २,७४,७३,०४२-०० | युनीयन बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ३,५६,३७,३४१-४४ | |
| ०-०० | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा सांगली | १,००,०००-०० | |
| **४,९०,२८,६४७-४०** | **इतर बँकातील शिल्लक** | | **५२,६७,६४७-९०** |
| ३,५७,१०,५९७-०४ | आय.सी.आय.सी.आय बँक शाखा जयसिंगपूर | १२,१६,९२४-४५ | |
| २,३२,३००-१७ | दि. फेडरल बँक लि. शाखा जयसिंगपूर | १७,२३६-१७ | |
| ३५,३२,९६०-६५ | आय.डी.बी.आय. बँक शाखा इचलकरंजी | २२,१४९-६५ | |
| ९५,५२,७८९-५४ | श्री वीरशैव सह. बँक शाखा जयसिंगपूर | ३५,११,३३७-६३ | |
| ०-०० | आय.सी.आय.सी.आय बँक शाखा जयसिंगपूर | ५,००,०००-०० | |
| | | | १,०३,२४,३३,५७२-०५ |
| **६१,७१,५३,९५६-०३** | **एकूण गुंतवणुक** | | |
| **१३,३३,५०,०००-००** | **मुदत बंद ठेवी** | **१९,७१,५०,०००-००** | |
| ५,००,००,०००-०० | के.डी.सी.सी बँक | ३,२५,००,०००-०० | |
| १०,००,०००-०० | के.डी.सी.सी बँक शाखा इचलकरंजी | २,१०,००,०००-०० | |
| ३,००,००,०००-०० | रत्नाकर बँक लि. | ७,०३,००,०००-०० | |
| ०-०० | आंध्रा बँक लि. शाखा जयसिंगपूर | १०,००,०००-०० | |
| **७५,७८,५८,८५५-८४** | **बेरीज पुढील पानावर** | | **१,१२,४७,४३,९४०-८८** |

## दिनांक ३१-३-२०१६ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१,५६,८१,९६,८१३-८६** | **मागील पान बेरीज** | | **१,९६,४१,६७,६४४-५९** |
| ११,७४,६७६-०० | ३) दामदुप्पट ठेव | ४४,२०,९६६-०० | |
| ५,९१,५३२-६० | ४) लखपती ठेव | ६,५१,१०४-६० | |
| ३४,७७,४१,९२०-०० | ५) पुर्नगुंतवणुक ठेव | ४१,३५,७७,४९५-०० | |
| ५,४३,८६,३५७-०० | ६) संकल्पपूर्ती ठेव | २३,४९,६५,०६५-०० | |
| ५,२३,९३,२०४-०० | ७) मुदत बाह्य ठेवी | ५,६६,०६,८२४-०० | |
| १,९४,८६,४२९-०० | ८) अल्पबचत ठेव | २,०७,१६,१९९-०० | |
| २७,९३,७७१-०० | १०) रिकरिंग ठेव | ३२,०९,२७०-०० | |
| ८,८०,३४,९००-०० | ११) सिध्दीपुर्ती ठेव | ४,०६,५२,१८५-०० | |
| **१,६३३-००** | **वसूलीची बिले** | | **१,२२,२५९-००** |
| **१,०२,२४,३८९-००** | थकव्याज तरतूद | | **१,२९,१४,६३३-००** |
| **२,५४,५७,८९५-००** | देणे व्याज | | **३,२६,६४,४६३-००** |
| **१,६२,६१,९१०-२९** | **इतर देणी** | | **१,५१,५१,५०२-५३** |
| ७,५४,४६७-०० | मागणी न केलेला लाभांश | ७,०५,२५३-०० | |
| ९७,६०,१२५-२९ | अनामत खाते | ९१,९९,०२९-५३ | |
| २३,५००-०० | शेअर्स अनामत | २६,९००-०० | |
| ७,३१,००१-०० | ऑडीट फी | ७,५९,६९१-०० | |
| १३,७७४-०० | मुदत बाह्य चेक/डी.डी. | १३,१२५-०० | |
| २,८८,५००-०० | जाहीर लिलाव अनामत | ०-०० | |
| १८,५८४-०० | पे ऑर्डर | ३७,३३०-०० | |
| ११,२३०-०० | टेलीफोन बिल देणे | २०,९००-०० | |
| ३६,५००-०० | दिवाबत्ती देणे | ४३,२००-०० | |
| २,४०,४७९-०० | इतर देणी | ४,०७,७८०-०० | |
| १७,६३,८५०-०० | बोनस देणे | २०,५१,४२९-०० | |
| ४,५००-०० | सरचार्ज देणे | १,१०,८६०-०० | |
| २६,१५,४००-०० | आयकर तरतूद | ०-०० | |
| ०-०० | प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना | २४-०० | |
| ०-०० | टी.डी.एस. | १७,७५,९८१-०० | |
| **१,६२,०१,४२,६४१-१५** | **बेरीज पुढील पानावर** | | **२,०२,५०,२०,५०२-१२** |

## दिनांक ३१-३-२०१६ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **७५,७८,५८,८५५-८४** | **मागील पान बेरीज** | | १,१२,४७,४३,९४०-८८ |
| ३,००,००,०००-०० | कराड अर्बन को-ऑप बँक लि., | १,००,००,०००-०० | |
| २,००,००,०००-०० | दि कॉसमॉस बँक लि., शाखा कोल्हापूर | ६,००,००,०००-०० | |
| २३,५०,०००-०० | लॉर्ड बालाजी बँक शाखा सांगली | २३,५०,०००-०० | |
| **२३,३९,९३,८८६-००** | **ट्रेझरी बिलामधील गुंतवणुक** | **५०,१४,५४,७७५-००** | |
| **२४,९७,०८,०२०-०३** | **सरकारी कर्जरोखे गुंतवणुक** | **३३,३७,२६,७४७-०५** | |
| **१,०२,०५०-००** | **शेअर्स** | **१,०२,०५०-००** | |
| १०००-०० | दि एम.एस.सी. बँक लि., मुंबई | १,०००-०० | |
| १,००,९५०-०० | के.डी.सी.सी बँक लि., कोल्हापूर | १,००,९५०-०० | |
| १००-०० | महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास बँक मुंबई | १००-०० | |
| **८२,११,५४,४८९-७७** | **एकूण कर्जे** | | ८६,६१,२५,१८८-०९ |
| **३८,०२,२१,३३९-४६** | **अल्प मुदतीची कर्जे पैकी** | **४१,२१,४४,८८३-१५** | |
| ३६,६७.८३,९०५-४६ | अ) तारणी | ३९,५७,५१,३९८-१५ | |
| १,३४,३७,४३४-०० | ब) विनातारणी | १,६३,९३,४८५-०० | |
| **३१,८९,९०,०००-७०** | **मध्यम मुदतीची कर्जे पैकी** | **२६,८४,८७,१५७-७८** | |
| ३१,६४,०१,२४५-७० | अ) तारणी | २६,५८,२३,४८९-७८ | |
| २५,८८,७५५-०० | ब) विनातारणी | २६,६३,६६८-०० | |
| **१२,१९,४३,१४९-६१** | **दिर्घ मुदतीची कर्जे पैकी** | **१८,५४,९३,१४७-१६** | |
| १२,१९,४३,१४९-६१ | अ) तारणी | १८,५४,९३,१४७-१६ | |
| ०-०० | ब) विनातारणी | ०-०० | |
| **१,६३३-००** | **वसूलीची बिले** | | १,२२,२५९-०० |
| **१,९१,८२,०३७-००** | **व्याज येणे** | | २,२८,४३,०३१-०० |
| १,०२,२४,३८९-०० | अ) थक कर्जावरील | १,२९,१४,६३३-०० | |
| ३६,१६,७७२-०० | ब) गुंतवणुकीवरील | २४,१४,११७-०० | |
| ५३,४०,८७६-०० | क) सरकारी कर्जरोख्यावरील | ७५,१४,२८१-०० | |
| **१,५९,८१,९७,०१५-६१** | **बेरीज पुढील पानावर** | | २,०१,३८,३४,४१८-९७ |

## दिनांक ३१-३-२०१६ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १,६२,०१,४२,६४१-१५ | **मागील पान बेरीज** | | २,०२,५०,२०,५०२-१२ |
| १,०१,२८,९१६-५१ | **निव्वळ नफा** | १,५०,०३,३३०-१३ | १,५०,०३,३३०-१३ |
| | बँक गॅरंटी (संभाव्य देयक रू. २५,००,०००/-) | | |
| | डिपॉझिट एज्युकेशनल अवेरनेस फंड (रु. ३,७१,०६९/-) | | |
| १,६३,०२,७१,५५७-६६ | **एकूण** | | २,०४,००,२३,८३२-२५ |

तपासले शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

**श्री. विनायक आ. कदम**
मुख्य लेखापाल

**श्री. सुभाष बाबू चौगुले**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मे. ए. डी. शिंदे आणि कंपनी**
चार्टर्ड अकौटंट
शासकीय लेखापरिक्षक

## दिनांक ३१-३-२०१६ ई चे ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १,५९,८१,९७,०१५-६१ | **मागील पान बेरीज** | | २,०१,३८,३४,४१८-९७ |
| २,४१,६९,५२१-२० | **स्थावर मालमत्ता** | | २,२१,२०,७६०-११ |
| ९६,९०,२०७-०० | जागा व इमारत | ९७,३८,४३१-०० | |
| ४३,०४,९५७-०० | कॉम्प्युटर डेडस्टॉक | ३१,६३,१४९-०१ | |
| १,००,८७,६६४-२० | डेडस्टॉक | ९०,९१,२०८-७० | |
| २,६११-०० | लायब्ररी | ३,१०५-०० | |
| ८४,०८२-०० | वाहन | १,२४,८६६-४० | |
| ७५,०४,६६७-०० | **इतर येणी** | | ३६,८१,०१७-०० |
| ३२,२५५-०० | लाईट डिपॉझीट | ३२,२५५-०० | |
| ७,३८७-०० | फोन डिपॉझीट | ७,३८७-०० | |
| ६,७७५-०० | लवाद डिपॉझीट | ६,२७५-०० | |
| ६४,६२४-०० | विमा प्रिपेड | ६५,८५५-०० | |
| ८,५७८-०० | टि.डी.एस. | १,३३,९९७-०० | |
| १०,०००-०० | ॲडव्हान्स खाते | ३०,०००-०० | |
| ५२,७१,७५०-०० | ॲडव्हान्स इन्कम टॅक्स | १६,००,०००-०० | |
| १८,०५,२४८-०० | इतर येणी | १८,०५,२४८-०० | |
| २,९८,०५०-०० | सरकारी कर्जमाफी योजना | ०-०० | |
| ४,००,३५३-८५ | **शिल्लक छपाई** | ३,८७,६३६-१७ | ३,८७,६३६-१७ |
| १,६३,०२,७१,५५७-६६ | **एकूण** | | २,०४,००,२३,८३२-२५ |

**श्री. महेंद्र आप्पाण्णा बागी**
व्हाईस चेअरमन

**श्री. महादेव बाबू राजमाने**
चेअरमन

*** संचालक मंडळ ***

श्री आण्णासाहेब रेवगोंडा पाटील
श्री. आदीनाथ बाळा कुडचे
श्री. शिवाजी शंकर पोळ
सौ. मंगलादेवी दरगू गावडे
श्री. भूपाल गोविंद खामकर
श्री. बापूसो नरसु चौगुले
श्री. राजेश बसलिंगाप्पा सानिकोप
श्री. आप्पासाहेब आण्णासो चौगुले-तज्ञ संचालक
श्री. दामोदर शंकर सुतार
श्री. सुरेश भूपाल पाटील
श्री. आप्पासो रामू नरुटे
श्री. महादेव विठ्ठल पाटील – तज्ञ संचालक
श्री. रमेश विठ्ठल पाटील
श्री. अशरफअली ई पटेल
सौ. विनया रमेश घोरपडे
सौ. सुजाता अरुण पाटील – कार्यलक्षी संचालिका

## दिनांक ३१-३-२०१६ ई अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **११,७१,२५,२६२-००** | **एकूण दिलेले व्याज** | | **१२,५५,१०,३७१-१२** |
| ११,७१,२५,२६२-०० | ठेवीवरील व्याज | १२,५५,१०,३७१-१२ | |
| **१,३३,९५,९८७-००** | **पगार व भत्ते** | | **१,५४,२१,५४६-००** |
| ४५,१३,७०३-०० | पगार | ६१,२५,५६४-०० | |
| ५५,२३,०१७-०० | महागाई | ६७,३२,४७७-०० | |
| १०,५९,६३२-०० | प्रॉव्हीडंड फंड | १२,२४,७७०-०० | |
| ६,८५,९३१-०० | हक्काचे रजेचा पगार | ७,३६,३५५-०० | |
| ४,७३,६९५-०० | ग्रॅच्युईटी | ४,२४,८३०-०० | |
| १,६८,०५३-०० | अलौन्स | १,७७,५५०-०० | |
| ९,७१,९५६-०० | नोकर प्रवास खर्च | ०-०० | |
| **३३,६५,८०२-९८** | **भाडे, कर, विमा व दिवाबत्ती** | | **३७,५२,१९७-१४** |
| ४,६१,२००-०० | ऑफीस भाडे | ४,६६,०००-०० | |
| ५१,१९७-९८ | क्लिअरिंग हाऊस भाडे | ४९,६२६-१४ | |
| ९०,६३५-०० | टॅक्स व परमीट | १,१८,०६७-०० | |
| २,५००-०० | संस्था व्यवसाय कर | २,५००-०० | |
| ३,२१,०२१-०० | विमा | २,२७,१६५-०० | |
| ६,०४,५०३-०० | दिवाबत्ती | ७,२८,३३०-०० | |
| १५,५७,८६७-०० | डी.आय.सी.जी.सी. प्रिमीअम | १६,८९,६५७-०० | |
| २,७६,८७९-०० | कनेक्टीव्हीटी रेंट | ४,७०,८५२-०० | |
| **७२,१५,१५३-६८** | **इतर खर्च** | | **७०,२९,१८५-१८** |
| १,०००-०० | वकील फी | १३,५००-०० | |
| ८९,७५०-०० | सल्लागार फी | २४,२५०-०० | |
| ५०,०००-०० | ऑडीट फी | ०-०० | |
| ३६,१३,१३८-०० | घसारा | २८,६३,५१०-०९ | |
| २,१८,६६२-८१ | स्टेशनरी सादीलवार | ३,५१,६७२-६८ | |
| १,६८,६००-०० | टेलीफोन | १,८५,११०-२८ | |
| ५१,७५१-०० | प्रवास खर्च | १,००,७०६-०० | |
| १,६७,६९२-०० | ऑफीस खर्च | २,०७,३७१-२५ | |
| ९४,४४५-०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ६७,१९९-०० | |
| ७,९५२-०० | किरकोळ खर्च | ३,९३५-०० | |
| २१,०३६-०० | समारंभ खर्च | ३८,८०१-०० | |
| १४,४४६-०० | संचालक मंडळ मिटींग खर्च | २२,६६६-०० | |
| १,२४,२२६-०० | कॉम्प्युटर देखभाल खर्च | १,५४,५९६-३५ | |
| ६,८५९-०० | वाहन दुरुस्ती खर्च | ४.१४५-०० | |
| ४९०-०० | रक्षणावळ | ५००-०० | |
| **१४,११,०२,२०५-६६** | **बेरीज पुढील पानावर** | | **१५,१७,१३,२९९-४४** |

## दिनांक ३१-३-२०१६ ई अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि.३१-३-२०१५ रूपये पैसे | उत्पन्न | रूपये पैसे | दि.३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१५,७८,२३,४०३-६३** | **एकूण मिळालेले व्याज** | | **१७,१०,५४,३०९-३२** |
| १०,२४,१२,४३१-७५ | कर्जावरील व्याज | ११,७१,६१,१९९-८० | |
| २,२०,१०,७४४-४६ | सरकारी कर्जरोख्यावरील व्याज | २,११,०७,६००-४१ | |
| ८९,९५,१५५-३५ | गुंतवणुकीवरील व्याज | १,४३,३२,९८५-०० | |
| १,३३,६३,६५८-५५ | ट्रेझरी बिलावरील व्याज | ७६,८६,९२४-०० | |
| १,१०,४१,४१३-५२ | म्युचल फंडावरील व्याज | १,०५,८४,५३२-११ | |
| ०-०० | आयकरवरील व्याज | १,८१,०६८-०० | |
| **४९,६९,८७६-५१** | **इतर उत्पन्न** | | **६१,७०,०९३-२३** |
| २,९५,२१३-७१ | कमीशन | ४,६०,४७५-३६ | |
| १०,३००-०० | पिग्मी मशीन भाडे | ९,८००-०० | |
| १,२९,५४५-०० | लॉकर भाडे | २,३९,१६०-०० | |
| ७४,५८५-०० | फॉर्म फी | ६८,८६०-०० | |
| १,०३,३०७-८० | इतर उत्पन्न | ३,२९,४१२-८७ | |
| २५,३२,३७५-०० | गुंतवणूक विक्रीतील नफा | ६,८८,७०५-०० | |
| १८,२४,४५०-०० | प्रोसेसिंग चार्जेस | १८,७३,५८०-०० | |
| १००-०० | लाभांश | १००-०० | |
| ०-०० | गुंतवणुक घसारा ज्यादा तरतूद | २५,००,०००-०० | |
| **१६,२७,९३,२८०-१४** | **बेरीज पुढील पानावर** | | **१७,७२,२४,४०२-५५** |

# दिनांक ३१-३-२०१६ ई अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि. ३१-३-२०१५ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१४,११,०२,२०५-६६** | **मागील पान बेरीज** | | **१५,१७,१३,२९९-४४** |
| १२,८६३-०० | वर्तमान पत्र | १३,८५२-०० | |
| ३,२१,९९६-८७ | छपाई आणि जाहीरात | ३,११,२२३-५३ | |
| २३,३०१-०० | दुरुस्ती | १,१८,५२९-०० | |
| १,५६,६०५-०० | संचालक मंडळ भत्ते | १,६५,०२०-०० | |
| १६,१०४-०० | वर्गणी | ५,०००-०० | |
| १४,६०,६५८-०० | पिग्मी एजंट कमीशन | १७,१२,७१३-०० | |
| १,६८,५४०-०० | कॉम्प्युटर सल्लागार फी | १.७१,०००-०० | |
| ३,९४४-०० | कोर्ट खर्च | २०,५८१-०० | |
| ३५,०२९-०० | शिपाई ड्रेस | ०-०० | |
| ६९,७९८-०० | नोकर प्रशिक्षण खर्च | ५०,०३८-०० | |
| ३,१६,२६७-०० | ए. एम. सी. चार्जेस | ३,९८,३०५-०० | |
| ०-०० | वेबसाईट खर्च | २४,९६१-०० | |
| **१,१५,६२,१५७-९७** | **तरतुदी** | | **१,०५,०७,७७२-९८** |
| ५४,००,०००-०० | संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद | ६३,५६,०००-०० | |
| ६,००,०००-०० | ऑडीट फी तरतूद | ६,७०,०००-०० | |
| २१,००,०००-०० | आयकर तरतूद | ०-०० | |
| १७,६०,०००-०० | बोनस तरतूद | २०,१५,०००-०० | |
| १०,५२.१५७-९७ | सरकारी कर्ज रोखे अधिमुल्य निर्लेखन | १०,६६,७७२-९८ | |
| ६,५०.०००-०० | उत्तम जिंदगी तरतूद | ४,००,०००-०० | |
| **१,०१,२८,९१६-५१** | **निव्वळ नफा** | | **१,५०,०३,३३०-१३** |
| **१६,२७,९३,२८०-१४** | **एकूण** | | **१७,७२,२४,४०२-५५** |

तपासले शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

**श्री. विनायक आ. कदम**
मुख्य लेखापाल

**श्री. सुभाष बाबू चौगुले**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मे. ए. डी. शिंदे आणि कंपनी**
चार्टर्ड अकौटंट
शासकीय लेखापरिक्षक

# दिनांक ३१-३-२०१६ ई अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि.३१-३-२०१५ रूपये पैसे | उत्पन्न | रूपये पैसे | दि.३१-३-२०१६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १६,२७,९३,२८०-१४ | मागील पान बेरीज | | १७,७२,२४,४०२-५५ |
| १६,२७,९३,२८०-१४ | एकूण | | १७,७२,२४,४०२-५५ |

**श्री. महेंद्र आप्पाण्णा बागी**
व्हाईस चेअरमन

**श्री. महादेव बाबू राजमाने**
चेअरमन


*** संचालक मंडळ ***

श्री आण्णासाहेब रेवगोंडा पाटील
श्री. आदीनाथ बाळा कुडचे
श्री. शिवाजी शंकर पोळ
सौ. मंगलादेवी दरगू गावडे
श्री. भूपाल गोविंद खामकर
श्री. बापूसो नरसु चौगुले
श्री. राजेश बसलिंगाप्पा सानिकोप
श्री. आप्पासाहेब आण्णासोा चौगुले-तज्ञ संचालक
श्री. दामोदर शंकर सुतार
श्री. सुरेश भूपाल पाटील
श्री. आप्पासो रामू नरुटे
श्री. महादेव विठ्ठल पाटील - तज्ञ संचालक
श्री. रमेश विठ्ठल पाटील
श्री. अशरफअली ई पटेल
सौ. विनया रमेश घोरपडे
सौ. सुजाता अरुण पाटील - कार्यलक्षी संचालिका

## SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES & NOTES FORMING PART OF THE BALANCE SHEET AS AT MARCH 31ST MARCH, 2016 AND PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2016

### SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES

**(1) Accounting convention :**

a) The financial statements are prepared under the historical cost convention, in accordance with the generally accepted accounting principles in India, the Accounting Standards issued by the Institute of Chartered Accountants of India and on the going concern concept except where where otherwise indicated.

b) Items of income and Expenditure are accounted for on accrual basis, unless other stated.

**(2) Revenue / Expenditure Recognition :**

a) Interest on performing advances is recognized on accrual basis.

b) Interest on non performing advances is on realization basis.

c) Interest on fixed income securities is recognized on accrual basis.

d) Commission, Locker rent, income on the bank guarantees is recognized as income on realization

e) Other items of income are recognized on realization basis.

f) Revenue expenditure is accounted for generally on accrual basis.

**(3) Advances :**

a) Advances are classified into standard, sub-standard, doubtful and loss assets in accordance with the guidelines issued by Reserve Bank of India from time to time.

b) Provision on Advances categorized under sub standard, Doubtful and Loss assets is made in accordance with the guidelines issued by Reserve Bank of India. In addition, a general provision has been made on all standard assets as per Reserve Bank of India directives.

**(4) Investments :**

a) The bank has classified the investments in accordance with R.B.I. guidelines applicable to Urban Co-op. Banks. Accordingly, classification of investments for the purpose of valuation is done under the following categories.
(i) Held to maturity (HTM), (ii) Available for Sale (AFS),

b) Premium, on investment under HTM category is amortised over the residual life of the investment.

c) Investments under "AFS" categories have been marked to market on the basis of guidelines issued by RBI, while net deprciation, if any, under each of the category has been provided for, net appreciation, if any has been ignored

d) Investments are grouped under following three heads for disclosure in Balance Sheet as per RBI guidelines.
(i) Central Government Securities (ii) Treasury Bills (iii) Shares in Co-op. Institutions.

**(5) Fixed Assets and Depreciation :**

a) Fixed assets (Building) are stated at acquisition price less depreciation provided, other fixed assets are stated at written down value.

b) Depreciation on fixed assets is provided for on the W.D.V. method at the rates prescribed by the management as under.
(i) Furniture & Fixture 10% (ii) Computer & Software 33.33% iii) Dead Stock 10% (iv) Library 10%

c) Depreciation on Fixed assets is charged for full year if assets is purchased and installed during the first six months of the year. If the assets is purchased and installed in the last six months then 50% of normal of depreciation is charged. No depreciation is charged on fixed assets sold during the year.

**(6) Retirement Benefits : (A.S.-15)**

a) Provident fund and family pension Scheme contribution are deposited in the Office of the PF Commissioner and are accounted for on actual payment basis.

b) Contribution to Group Gratuity Scheme of Life Insurance Corporation of India is made on the basis of actuarial valuation done by LIC and the same is charged to Profit and Loss Account.

**(7) Taxes on Income : (A.S. - 22)**

a) Provision for current Tax is made as per provision of income Tax Act. 1961 on basis of estimated taxable income for the year.

**(8) Other Notes :**

a) Reconciliation of Inter Branch Adjustment and Inter Bank Accounts as on 31-03-2016 are completed. Follow up for elimination of pending items therein is in progress.

**(9) Net Profit :**

Net Profit has been arrived at after provisions on Performing Assets, Non Performing Assets, Investment Depreciation as fund and other usual and necessary provisions as per R.B.I. norms.

# भांडवल पर्याप्तता प्रमाण

भागभांडवल व स्वनिधीचे जोखीम संपत्तीशी प्रमाण (सी. आर. ए. आर.) १६.२३ टक्के असुन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सदरचे प्रमाण ९.०० % किमान राखणे बंधनकारक आहे. त्यामुळे हे प्रमाण भांडवल पर्याप्तता प्रमाणाची उत्तम स्थिती दर्शविते.

## भांडवल पर्याप्तता निकषाची स्थिती दर्शविणारा तक्ता (आकडे लाखांत)

| वर्ष | भांडवल निधी | | | | भांडवल निधीचे जोखीम मालमत्ता प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | टायर १-अ | टायर २-अ | एकूण निधी | जोखीम मालमत्ता | अ | ब | अ + ब |
| ३१/०३/१४ | ७४३.१९ | ५८.४० | ८०१.५९ | ६२२६.४० | ११.३४ | ०.९४ | १२.२८ % |
| ३१/०३/१५ | १०३८.३० | ६६.४० | ११०४.७० | ७७१४.२६ | १३.४६ | ०.८६ | १४.३२ % |
| ३१/०३/१६ | ११७३.०१ | ९०.६४ | १२६३.६५ | ७७८८.२३ | १५.०६ | १.१७ | १६.२३ % |

## उत्तम जिंदगी तरतूद तुलनात्मक स्थिती (आकडे लाखांत)

| अ.नं. | तपशील | सुरवातीची शिल्लक | चालु वर्षातील वाढ | चालु वर्षातील घट | वर्ष अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१३-२०१४ | १९.०० | ५.०० | -- | २४.०० |
| २. | २०१४-२०१५ | २४.०० | ६.५० | -- | ३०.५० |
| ३. | २०१५-२०१६ | ३०.५० | ४.०० | -- | ३४.५० |

## संचालक व नातेवाईक यांना दिलेली कर्जे (दि. ०१.०४.२०१५ ते ३१.०३.२०१६ अखेर) (आकडे लाखांत)

| अ.नं. | तपशील | वर्षाची सुरुवातीची येणे बाकी | चालु वर्षात संचालकांची कर्जाऊ रक्कम | चालु वर्षात परत फेड रक्कम | चालु वर्षा अखेर येणे बाकी | येणे रक्कम पैकी थकीत रक्कम | मार्च नंतर थकबाकी पैकी वसुल रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक | ०.०० | २६.०५ | ०.०० | २६.०५ | -- | -- |
| २. | नातेवाईक | ०.०० | ६.३५ | ०.०० | ६.३५ | -- | -- |
| | एकूण रुपये | ०.०० | ३२.४० | ०.०० | ३२.४० | -- | -- |

*** सदरची कर्जे ही ठेव तारण कर्जे आहेत.**

## ठेव विमा योजना

बँकेने अहवाल सालामध्ये ठेव विमा Deposit Insurance and Credit Guarantee Corporation of India कडे हप्ते भरलेले असून त्यांचा तपशील

| अ.नं. | कालावधी | विमा हप्ता भरलेची तारीख | विमा प्रिमियमची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दिनांक : ०१.०४.२०१५ ते ३०.०९.२०१५ | २९.०४.२०१५ | ८,३२,२८९/- |
| २. | दिनांक : ०१.१०.२०१५ ते ३१.०३.२०१६ | ०८.१०.२०१५ | ८,५७,३६८/- |
| ३. | दिनांक : ०१.०४.२०१६ ते ३०.०९.२०१६ | २९.०४.२०१६ | १०,५७,९७७/- |

## CONTINGENT LIABILITIES - DEAF

(Rs. in Lakhs)

| Particulars | 31-03-2016 | 31-03-2015 |
|---|---|---|
| Opening balance of amounts transferred to DEAF | 3.62 | 0.00 |
| Add : Amount reimbursed by DEAF during the year | 0.09 | 3.62 |
| Less : Amount reimbursed by DEAF towards claims | 0.00 | 0.00 |
| Closing balance of amounts transferred to DEAF | 3.71 | 3.62 |

## सन २०१६-२०१७ सालाकरिता संचालक मंडळाने सुचविलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

| अ.नं | खात्याचा तपशील | सन २०१५-१६ करीता मंजूर बजेट रूपये पैसे | सन २०१५-१६ मधील प्रत्यक्ष खर्च रूपये पैसे | अंदाजापेक्षा जादा खर्च रूपये पैसे | अंदाजापेक्षा कमी खर्च रूपये पैसे | सन २०१६-१७ करीता अंदाजे बजेट रूपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पगार | १,६०,००,०००.०० | १,५४,२१,५४६.०० | | ५,७८,४५४.०० | १,९०,००,०००.०० |
| २. | प्रवास खर्च | १,५०,०००.०० | १,००,७०६.०० | | ४९,२९४.०० | १,२०,०००.०० |
| ३. | ऑफिस भाडे/ रक्षणावळ | ५,००,०००.०० | ४,६६,५००.०० | | ३३,५००.०० | ७,००,०००.०० |
| ४. | टेलीफोन | २,००,०००.०० | १,८५,११०.२८ | | १४,८८९.७२ | ३,००,०००.०० |
| ५. | टपाल व तार | २५,०००.०० | ०.०० | | २५,०००.०० | २५,०००.०० |
| ६. | समारंभ खर्च/वर्तमान पत्र/वर्गणी | १,००,०००.०० | ५७,६५३.०० | | ४२,३४७.०० | ७५,०००.०० |
| ७. | स्टेशनरी सादीलवार | ३,००,०००.०० | ३,५१,६७२.६८ | ५१६७२.६८ | | ६,००,०००.०० |
| ८. | विमा | ३,५०,०००.०० | २,२७,१६५.०० | | १,२२,८३५.०० | ३,००,०००.०० |
| ९. | छपाई व जाहिरात | ५,००,०००.०० | ३,११,२२३.५३ | | १,८८,७७६.४७ | ८,००,०००.०० |
| १०. | वार्षीक सर्वसाधारण सभा खर्च | १,५०,०००.०० | ६७,१९९.०० | | ८२,८०१.०० | १,००,०००.०० |
| ११. | ऑडीट फी | ७,५०,०००.०० | ६,७०,०००.०० | | ८०,०००.०० | ९,००,०००.०० |
| १२. | घसारा | ४०,००,०००.०० | २८,६३,५१०.०९ | | ११,३६,४८९.९१ | ४५,००,०००.०० |
| १३. | संचालक मंडळ भत्ते/ खर्च | २,५०,०००.०० | १,८७,६८६,.०० | | ६२,३१४.०० | २,५०,०००.०० |
| १४. | शिपाई ड्रेस | २५,०००.०० | ०.०० | | २५,०००.०० | २५,०००.०० |
| १५. | पिग्मी कमीशन / कमीशन | २०,००,०००.०० | १७,१२,७१३.०० | | २,८७,२८७.०० | २३,००,०००.०० |
| १६. | वाहन खर्च | ५०,०००.०० | ४,१४५.०० | | ४५,८५५.०० | २५,०००.०० |
| १७. | कोर्ट खर्च/कॉम्प्युटर सल्लागार फी | ४,००,०००.०० | २,२९,३३१.०० | | १,७०,६६९.०० | ४,००,०००.०० |
| १८. | ऑफिस खर्च/किरकोळ खर्च | ३,००,०००.०० | २,११,३०६.२५ | | ८८,६९३.७५ | ४,००,०००.०० |
| १९. | दुरुस्ती | १,००,०००.०० | १,१८,५२९.०० | १८,५२९.०० | | २,००,०००.०० |
| २०. | दिवाबत्ती | ८,००,०००.०० | ७,२८,३३०.०० | | ७१,६७०.०० | १०,००,०००.०० |
| २१. | प्रशिक्षण खर्च | २,००,०००.०० | ५०,०३८.०० | | १,४९,९६२.०० | २,००,०००.०० |
| २२. | क्लिरिंग हाऊस भाडे | ५५,०००.०० | ४९,६२६.१४ | | ५,३७३.८६ | १,००,०००.०० |
| २३. | ठेवीवरील/कर्जावरील व्याज | १४,००,००,०००.०० | १२,५५,१०,३७१.१२ | | १,४४,८९,६२८.८८ | १५,००,००,०००.०० |
| २४. | डी.आय.सी.जी.सी.प्रिमीअम | २०,००,०००.०० | १६,८९,६५७.०० | | ३,१०,३४३.०० | २२,००,०००.०० |
| २५. | संस्था व्यवसाय | २,५००.०० | २,५००.०० | | ०.०० | २,५००.०० |
| २६. | कॉम्प्युटर देखभाल खर्च | ६,००,०००.०० | ५,५२,९०१.३५ | | ४७,०९८.६५ | ८,००,०००.०० |
| २७. | आयकर तरतूद | २५,००,०००.०० | ०.०० | ०.०० | २५,००,०००.०० | २५,००,०००.०० |
| २८. | संशयित व बुडीत कर्ज निधी तरतूद | ५०,००,०००.०० | ६३,५६,०००.०० | १३,५६,०००.०० | | ७५,००,०००.०० |
| २९. | शाखा उद्घाटन खर्च | ०.०० | ०.०० | | | १०,००,०००.०० |
| ३०. | कनेक्टीव्हीटी रेंट | ४,००,०००.०० | ४,७०,८५२.०० | ७०,८५२.०० | | ६,००,०००.०० |
| ३१. | उत्तम जिंदगी तरतूद | ६,००,०००.०० | ४,००,०००.०० | | २,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| ३२. | इतर कर | १,२०,०००.०० | १,१८,०६७.०० | | १,९३३.०० | १,५०,०००.०० |
| ३३. | कर्जेरोखे अधिमुल्य निर्लेखन | १०,५३,०००.०० | १०,६६,७७२.९८ | १३,७७२.९८ | | १०,७५,०००.०० |
| ३४. | बोनस तरतूद | २५,००,०००.०० | २०,१५,०००.०० | | ४,८५,०००.०० | ३०,००,०००.०० |
| ३५. | वेबसाईट खर्च | ०.० | २४,९६१.०० | २४,९६१ | | २५,०००.०० |
| | **एकूण** | **१८,१९,८०,५००.००** | **१६,२२,२१,०७२.४२** | **१५,३५,७८७.६६** | **२,१२,९५,२१५.२४** | **२०,१६,७२,५००.००** |

२०१६-१७ या सालातील उत्पन्न रु. २३२०.०० लाख मिळेल तरतूद पूर्व नफा रु. ३००.०० लाख राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. विनायक आ. कदम** | **श्री. सुभाष बाबू चौगुले** | **श्री. महेंद्र आप्पाण्णा बागी** | **श्री. महादेव बाबू राजमाने** |
| मुख्य लेखापाल | मुख्य कार्यकारी अधिकारी | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

# ANNEXURE "A"

| | | |
|---|---|---|
| Name of the Bank | : | **JAYSINGPUR UDGAON SAHAKARI BANK LTD. JAYSINGPUR.** |
| Head Office Address | : | Kolhapur Road, Opp. Police Station<br>Jaysingpur-416101, Tal. Shirol<br>Dist. Kolhapur Maharashtra 02322-225277 |
| Date of Registration | : | 22.06.1960 |
| Date & RBI Licence No. | : | UBD/ MH/ 956 p Dtd. 31.12.1987 |
| Jurisdiction | : | Kolhapur and Sangli Districts |

## Position As on 31st March 2016

| | | | | |
|---|---|---|---|---|
| No. of Branches Including Head Office | : | 1+10 Branches = 11 | | |
| Membership | : | Regular - 11106 | | |
| | : | Nominal - 2088 | | |
| Paid up Share Capital | : | Rs. 595.00 Lakhs | | |
| Total Reserves &Other Funds | : | Rs. 983.75 Lakhs | | |
| Deposits | : | Saving | Rs. | 4122.70 Lakhs |
| | | Current | Rs. | 622.58 Lakhs |
| | | Fixed | Rs. | 13317.64 Lakhs |
| ` | | **Total** | **Rs.** | **18062.92 Lakhs** |
| Advances | : | Secured | Rs. | 8470.68 Lakhs |
| | | Unsecured | Rs. | 190.57 Lakhs |
| | | **Total** | **Rs.** | **8661.25 Lakhs** |
| | | % of Priority Sector Adv. | | 72.38 % |
| | | % of Weaker Section Adv. | | 31.86 % |
| Borrowings | : | Nil | | |
| Investments | : | Rs. 10324.34 Lakhs | | |
| Profit for the year | : | 150.03 Lakhs | | |
| Overdues % (Percent) | : | 5.87 % | | |
| Audit Classification | : | **"A"** Grade | | |
| Total Staff | : | 83 | | |
| Working Capitals | : | Rs. 20269.88 Lakhs | | |

### Our Branches

| | | | |
|---|---|---|---|
| Jaysingpur Br. | Tel. No. (02322) 226977 | Kavate Guland Br. | Tel No. (02322) 276611 |
| Kurundwad Br. | Tel. No. (02322) 244296 | Sangli Br. | Tel No. (0233) 2330666 |
| Dattanagar Br. | Tel. No. (02322) 237888 | Khidrapur Br. | Tel No. (02322) 265777 |
| Abdul Lat Br. | Tel. No. (02322) 254877 | Yadrav Br. | Tel No. (02322) 252527 |
| Chandur Br. | Tel. No. (0230) 2392177 | Dattawad Br. | Tel No. (02322) 241777 |

# BALANCE SHEET OF BANK DISCLOSURE OF INFORMATION AS ON 31ST MARCH 2016 IN TERMS OF RESERVE BANK OF INDIA CIRCULARS

| Sr.No. | Particulars | 31.03.2015 | 31.03.2016 |
|---|---|---|---|
| 1. | **Capital to Risk Asset Ration (CRAR)** | 14.32% | 16.23% |
| 2. | **Investment in G. Sec.** | | |
| | i) Book Value | 2497.08 | 3337.27 |
| | ii) Face Value | 2475.00 | 3325.00 |
| | iii) Market Value | 2382.66 | 3259.49 |
| 3. | **Advances against Real Estate, Construction Business & Housing** | | |
| | i) Real Estate | 29.28 | 286.10 |
| | ii) Housing | 864.91 | 613.51 |
| | iii) Builders and Developers | 0.00 | 0.00 |
| 4. | **Advances against Shares and Debentures** | 0.00 | 0.00 |
| 5. | **Advances to Directors, their relatives, companies / firms in which they are interested** | | |
| | i) Fund Based | 0.00 | 32.40 |
| | ii) Non Fund Based | 0.00 | 0.00 |
| 6. | **NPAs :** | | |
| | i) Gross NPAs Amount | 512.18 | 534.78 |
| | ii) Net NPAs Amount | 73.68 | 112.22 |
| 7. | **Movement of NPAs** | | |
| | Opening Balance | 364.22 | 512.18 |
| | Add : Additions during the year | 219.60 | 286.00 |
| | Less : Recovery during the year | 71.64 | 263.40 |
| | Closing Balance | 512.18 | 534.78 |
| 8. | **Average Cost of Deposits** | 8.47% | 8.52% |
| 9. | **Profitability :** | | |
| | i) Interest income as a percentage of working funds | 9.74% | 8.44% |
| | ii) Non interest income as a percentage of working funds | 0.31% | 0.30% |
| | iii) Operating Profit as percentage of working funds | 1.34% | 1.26% |
| | iv) Returns on Assets | 0.64% | 0.89% |
| | v) Business per employee | 283.98 | 321.98 |
| | vi) Profit per employee | 1.28 | 1.81 |
| 10. | **Movements is provision** | | |
| | i) Towards NPAs (BDDR) | 356.00 | 422.56 |
| | ii) Towards Depreciation on Investments | 39.10 | 14.10 |
| | iii) Towards Investments Fluctuation Reserve | 1.00 | 2.00 |
| | iv) Towards Standard Assets | 30.00 | 34.50 |
| 11. | **Foreign currency assets and liabilities** | 0.00 | 0.00 |

# जयसिंगपूर - उदगांव सहकारी बँक लिमिटेड, जयसिंगपूर

## सन २०१५-१६ ते २०२०-२०२१ संचालक मंडळ


श्री.महादेव बा. राजमाने
चेअरमन


श्री.महेंद्र आ. बागी
व्हा. चेअरमन


श्री.आण्णासाहेब रे. पाटील
संचालक


श्री.आदिनाथ बा. कुडचे
संचालक


श्री. दामोदर शं. सुतार
संचालक


श्री. शिवाजी शं. पोळ
संचालक


श्री. राजेश ब. सानिकोप
संचालक


श्री. भूपाल गो. खामकर
संचालक


श्री. रमेश वि. पाटील
संचालक


श्री. सुरेश भू. पाटील
संचालक


श्री. बापूसो न. चौगुले
संचालक


श्री. आप्पासो रा. नरूटे
संचालक


श्री. बाबु शि. गौराज
संचालक (२-११-२०१५ पर्यंत)


श्री. अशरफअली ई.पटेल
संचालक (२-११-२०१५ पासून)


सौ. विनया र. घोरपडे
संचालिका


सौ. मंगलादेवी द. गावडे
संचालिका


श्री. आप्पासो आ. चौगुले
तज्ञ संचालक


श्री. महादेव वि. पाटील
तज्ञ संचालक


सौ. सुजाता अ. पाटील
कार्यलक्षी संचालिका


श्री. सुभाष बा. चौगुले
मुख्य कार्यकारी अधिकारी




**बुक-पोस्ट**
(छापील पुस्तक)

प्रति,
मा. सौ./श्री. ____________________

प्रेषक :
चेअरमन
**मा. श्री. महादेव बाबू राजमाने**
**जयसिंगपूर-उदगांव सहकारी बँक लि., जयसिंगपूर**
तालुका – शिरोळ, जिल्हा – कोल्हापूर

श्री साईनाथ ऑफसेट, दत्तनगर – शिरोळ (०२३२२) २३७२३०